## मा.संचालक मंडळ सभा क्र. १० दिनांक २६/०९/२०२४ ठराव ०४ G /१:-

### मेंबर बेनीफिट फंड नियम -

आपल्या कार्यक्षेत्रातील बहुतांश सर्व बँका मेंबर बेनीफिट फंड किवा इतर कोणत्याही स्वरूपाची एक्स्ट्रा मदत सभासदाना करत नाहीत मात्र आपण सभासदाला आजाराच्या वेळेस काही मदत करता यावी या उद्देशाने होणाऱ्या नफ्यातील काही रक्कम बाजूला काढून मेंबर बेनीफिट फंड तयार केला आहे. या रककमेचा विनियोग चांगल्या पद्धतीने अधिकाधिक गरजू संभासदाना घेता यावा या हेतूने मा .संचालक मंडळाने यापूर्वी असणारे मेंबर बेनीफिट फंड नियम बदलून नविन नियम दिनांक ०१/१०/२०२४ पासून लागू केले. खालील नव्याने बनविलेल्या नियमाची पूर्तता झालेले अर्जच संचालक मंडळ सभेसमोर सादर करावे असे सांगितले . **खालील नमूद केलेल्या आजारा व्यतिरिक्त इतर कोणत्याही आजारास मदत करता येणार नाही असे संचालक मंडळाने स्पष्ट केले .**

नविन नियमानुसार जे आजार व नियम तयार करून दिनांक ०१/१०/२०२४ पासून अंमलबजावणी करण्यास सांगितले आहे ते खालीलप्रमाणे

| अ.न | प्रकार | सुधारित नियम |
|---|---|---|
| १ | आजार | १ बायपास<br>२ ॲनजिओ प्लास्टी<br>३ ओपन हार्ट सर्जरी<br>४ स्पेस मेकर<br>५ स्टेमिक चेस्ट सर्जरी<br>६ ऑर्गन ट्रान्सप्लांट (ऑर्गन बसविणे )<br>७ व्हाल बदलणे<br>८ सर्व प्रकारचे कर्करोग<br>९ किडनी विकार (डायलिसिससाठी )<br>१० लिव्हर रोग<br>११ मेंदू विकार (ब्रेन हॅम रेज ,ब्रेनट्यूमर)<br>१२ गुडघे बदलणे<br>१३ गंभीर गॅंगरीन (case for operation,)<br>१० गंभीर अपघात – कंबरेची शस्त्रक्रिया , हिपजाइंट ,हेड इनज्यूरी ,छाती –बरगडया फ्रॅक्चर<br>११ स्त्रीयांचे विकार - गर्भ पिशवीचे विकार ,पोटाची सर्जरी<br>**<u>वय वर्ष ७० पेक्षा अधिक वय असणाऱ्या संभासदासाठी :-</u>**<br>वरील आजारा व्यतिरिक्त डोळ्याची सर्जरी ,मोतीबिंदु ,काचबिंदु . |
| २ | पात्र रक्कम | **<u>वय वर्ष ७० पर्यंत :-</u>**<br>एकूण खर्चाच्या १५ % किवा रुपये १०,०००/- यापेक्षा जी रक्कम कमी असेल ती रक्कम<br>**<u>वय वर्ष ७० पेक्षा अधिक :-</u>**<br>एकूण खर्चाच्या २० % किवा रुपये १०,०००/- यापेक्षा जी रक्कम कमी असेल ती रक्कम |
| ३ | पात्र डॉक्टर | एमबीबीएस / एम डी /एम एस किवा तत्सम पदवी (BHMS/DHMS/BAMS/LECHनकोत) |
| ४ | कालावधी | ३ वर्षातून एकदा किवा ३ वर्षात जास्तीत जास्त रु .१०,०००/- पर्यंत |
| ५. | डिसचार्जे | डिसचार्जे दिल्यानंतर १ महिन्याच्या आत बँकेत <u>छायाकित प्रती</u> सह अर्ज सादर करणे |
| ६ | आर्थिक मदत अर्ज | संचालक मंडळ सभेच्या किमान ३ दिवस अगोदर बँकेत सादर होणे आवश्यक आहे . उशिरा प्राप्त झालेले अर्ज पुढील संचालक मंडळ सभेत सादर करण्यात येईल . |
| ७ | बिल व इतर कागद पत्रे | बिल व इतर कागद छायाकित प्रती(झेरॉक्स) स्वीकारल्या जातील |
| ८ | उपचार पद्धत | आयुर्वेदिक उपचार , होमिओपथिक उपचार ,कॉस्मेटिक उपचार याकरिता आर्थिक मदत दिली जाणार नाही |
| ९ | अपघात | गंभीर ॲक्सीडेंट यात कोणत्याही प्रकारचे व्यसन करून अपघात झाल्यास सदर मदत दिली जाणार नाही |
| १० | सभासद कालावधी | बँकेचे सभासद झाल्याच्या दिनांकापासून १ वर्षांनंतर सदर क्लेम करण्यास सभासद पात्र होईल . |
| ११ | शेअर्स भांडवल | रु १०००/- व त्यापेक्षा अधिक भाग धारण करणारे सभासदच पात्र असतील. |

Certified True Copy
For The Sangamner Merchants Co-op Bank Ltd.
Authorised Officer